दिनांक ०६/०८/२०२२

**प्रसिध्दी पत्रक**

**आ.लो.से. श्री. हेमंत पाटील, वय 44 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-सहाय्यक अभियंता, महावितरण कार्यालय शाखा- नेरी, ता.जामनेर जि. जळगांव (वर्ग-2) यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु.6,00,000/- लाचेची मागणी केल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे जामनेर जि. जळगांव गु.र.नं.350/2022 कलम 7 भ्र.प्र.अं.1988. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री. हेमंत पाटील, वय 44 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद-सहाय्यक अभियंता, महावितरण कार्यालय शाखा- नेरी ता.जामनेर जि. जळगांव (वर्ग-2) |
| लाच मागणी रक्कम | :- | 6,00,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | निरंक. |
| तपास अधिकारी | :- | शुभांगी सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे मौजे पाळधी ता. जामनेर जि. जळगांव शिवारात गट नं. 1018/1 मध्ये सामाईक शेतजमीन मध्ये लघु उदयोगासाठी 25 के.व्ही.चा ट्रान्सफार्मर व नविन विज कनेक्शन मिळणेसाठी एन.एस.सी. (New Service Connection) योजनेमधुन मंजुर करुन देण्यासाठी . |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे मौजे पाळधी ता. जामनेर जि. जळगांव शिवारात गट नं. 1018/1 मध्ये सामाईक शेतजमीन मध्ये लघु उदयोगासाठी 25 के.व्ही.चा ट्रान्सफार्मर व नविन विज कनेक्शन मिळणेसाठी एन.एस.सी. (New Service Connection) योजनेमधुन मंजुर करुन देण्यासाठी आ.लो.से.श्री. हेमंत पाटील हे रुपये 6,00,000/- लाचेची मागणी करीत असले बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय औरंगाबाद येथे तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारी वरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. यांनी पंच साक्षीदारासमक्ष तक्रारदार यांना रुपये 6,00,000/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. आ.लो.से.यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने आ.लो.से. यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही.<br>दिनांक 06/08/2022 रोजी आ.लो.से. यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन जामनेर जि. जळगाव येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शुभांगी सुर्यवंशी यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोअं/राजेंद्र सिनकर.विलास चव्हाण, राजेंद्र जोशी,चालक-चंद्रकांत बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com. 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 8888807299 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644944
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.

पोलीस उप अधिक्षक कार्यालय अँन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद